**प्रेसनोट दि. १७.०७.२०२२**

लोकसेवक गणेश ईश्वरा बागडी , पोलीस नाईक, जत पोलीस ठाणे, रा. मिरज व लोकसेवक संभाजी मारूती करांडे, पोलीस नाईक, जत पोलीस ठाणे रा. कोसारी ता. जत यांनी तक्रारदार यांचेकडे गुन्हयाचे तपासात मदत करण्यासाठी २५,०००/- रूपये लाच मागणी करून २५,०००/- रूपये लाच रक्कम स्वीकारलेने त्यांचे विरूध्द सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

जत पोलीस ठाणे तक्रारदार यांचे भावावर दाखल असले अपघाताचे गुन्हयामध्ये सहकार्य करणे करीता व अपघातातील मोटार सायकल सोडणे करीता लोकसेवक गणेश ईश्वरा बागडी यांनी तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रूपये लाच मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी इकडील कार्यालयात तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १७.०७.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे लोकसेवक गणेश ईश्वरा बागडी व दि. १८.०७.२०२२ रोजी लोकसेवक संभाजी मारूती करांडे पोलीस नाईक यांचेकडे पडताळणी त्यांनी तक्रारदार यांचे भावावर दाखल असले अपघाताचे गुन्हयामध्ये सहकार्य करणे करीता व अपघातातील मोटार सायकल सोडणे करीता २५,०००/- रूपये लाचेची मागणी मागणी केली व लाच रक्कम घेवुन येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.१८.०७.२०२२ रोजी जत पोलीस ठाणे येथे सापळा लावला असता लोकसेवक संभाजी मारूती करांडे पोलीस नाईक जत पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून २५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक गणेश ईश्वरा बागडी , पोलीस नाईक, जत पोलीस ठाणे, रा. मिरज व लोकसेवक संभाजी मारूती करांडे, पोलीस नाईक, जत पोलीस ठाणे रा. कोसारी ता. जत यांचे विरुध्द जत पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली, श्री. विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक, श्री. दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार अविनाश सागर, प्रितम चौगुले, धनंजय खाडे, संजय संकपाळ, रविंद्र धुमाळ, भास्कर भोरे, संजय कलगुटगी, राधीका माने यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली
सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner